# प्रकरण – दुसरे

# गौतम बुद्धांचे वर्ण व जातीव्यवस्थाविषयक विचार

## प्रकरण - दुसरे

# गौतम बुद्धांचे वर्ण व जातीव्यवस्थाविषयक विचार

प्राचीन भारताच्या इतिहासामध्ये इ. स. पूर्व ६वे शतक अतिशय महत्त्वाचे ठरले. इ.स. पूर्व ६व्या शतकामध्ये भारतात बौद्ध व जैन धर्माचा उदय झाला. या दोन धर्मांनी भारतीय समाजव्यवस्थेच्या स्वरूपामध्ये आमूलाग्र व क्रांतीकारक परिवर्तन घडवून आणण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली. उत्तर ऋग्वेद काळामध्ये समाजामध्ये यज्ञीय कर्मकांडांना, यज्ञीय हिंसेला, व जन्माधिष्ठित वर्ण व जातीव्यवस्था यांना अवास्तव महत्त्व प्राप्त झाले होते. या अनिष्ट घटनांचा या दोन धर्मांनी प्रखर विरोध केला. गौतम बुद्धांनी बौद्ध धर्माची स्थापना केली, तर वर्धमान महावीरांनी जैन धर्माची स्थापना केली. गौतम बुद्धांनी वर्ण व जातीव्यवस्थेवर कठोर टीका केली आणि मानवाला सम्यक् जीवनमार्ग दाखविण्यासाठी धम्मसंघाची स्थापना केली. गौतम बुद्धांनी यज्ञीय कर्मकांडांना विरोध केला. त्यांनी वेदाचे प्रामाण्य नाकारले व वैदिक ग्रंथावर आधारित चार्तुवर्ण्यव्यस्थेचा सिद्धांत नाकारला. त्याचबरोबर गौतम बुद्धांनी आदर्श समाज व राज्यव्यवस्था कशी निर्माण करता येईल या संदर्भात विचार मांडले. त्यामुळे गौतम बुद्धांचे वर्ण व जातीव्यवस्था विषयक विचार समूजन घेणे अत्यंत आवश्यक ठरते.

**गौतम बुद्धांच्या काळातील सामाजिक परिस्थिती आणि वर्णव्यवस्था :**

गौतम बुद्धांचे वर्ण व जातीव्यवस्थाविषयक विचार समजून घेण्यासाठी प्रथम त्या काळातील सामाजिक परिस्थिती आणि प्रचलित वर्णव्यवस्था समजून घेणे अतिशय महत्त्वाचे आहे. गौतम बुद्धांचा कालखंड हा इ.स. पूर्व ६व्या शतकाचा आहे. याच काळास उत्तर ऋग्ववेदकाळ म्हणून ओळखले जाते. प्राचीन भारतामध्ये उत्तर ऋग्वेद काळामध्ये समाजामध्ये अनेक स्थित्यंतरे घडून आली. याच काळात वैदिक धर्माचे समाजावर वर्चस्व प्रस्थापित झाले. वैदिक धर्मसंस्था प्रबळ झाली. समाजामध्ये यज्ञाचे स्तोंभ माजले, या यज्ञामध्ये मोठ्या प्रमाणात प्राण्यांची – पशुंची हत्या केली जावू लागली. यज्ञाच्या माध्यमातून समाजव्यवस्थेवर पुरोहितांचे वर्चस्व निर्माण झाले.

त्याचबरोबर समाजामध्ये वैदिक चार्तुवर्ण्यव्यवस्थेचाही मोठा पगडा बसला. याच काळात जन्मधिष्ठित वर्ण व जातिव्यवस्था निर्माण होण्यास सुरूवात झाली. वर्ण-व्यवस्थेने तांत्रिक स्वरूप धारण केले. परिणामी वर्णविषयक व जातीविषयक नियम कडक बनले. व्यक्तीच्या कर्मावरून नव्हे तर तिच्या जन्मावरून तिची जात व वर्ण ठरविला जावू लागला, त्याचबरोबर व्यवसायही त्या-त्या जातीशी केंद्रीत झाला. त्यामध्ये कौशल्याला, गुणवत्तेला कोणतेही महत्त्व राहिले नाही. उदा. तत्कालिन समाजव्यवस्था व धर्मव्यवस्थेने ब्राह्मणांनी फक्त वेदाभ्यासच करावा, क्षत्रियांनी राज्याचे रक्षण करावे, वैश्यांनी व्यापार व शेती करावी तर शूद्रांनी वरील तीन वर्णांना मदत करावी. त्याचबरोबर खालच्या पातळीवरील सर्व कामे करावीत अशा प्रकारचा दंडक घालून दिला. एका वर्णातील व्यक्तीने दुसऱ्या वर्णातील व्यवसाय करणे, हे धर्मविरोधी कृत्य मानले जावू लागले व असा कोणी प्रयत्न केला तर त्याला त्याबद्दल शिक्षा दिली जात असे. समाजामध्ये ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र असे चार वर्ण होते. आणि त्यांच्यामध्येही अनुक्रमे उच्च-नीच अशा स्वरूपाची उतरंड होती. यालाच ''चार्तुर्वण्यव्यवस्था'' म्हणून ओळखले जात असे. वर्णव्यवस्थेच्या अनुषंगानेच समाजामध्ये उच्च-नीच, श्रेष्ठ-कनिष्ठ अशी भावना निर्माण झाली. आहार-विहार, विवाह, परस्पर सहवास याचे नियम कडक झाले. जातीची बंधने कडक झाली.

शूद्रांना व स्त्रियांना अधिकार नाकारण्यात आले. अस्पृश्यतेचा विचारही याच काळात रूढ होण्यास सुरूवात झाली.

**गौतम बुद्धांचा वेदप्रामाण्यास व यज्ञातील हिंसेस विरोध :**

ऋग्वेद काळामध्ये यज्ञयागास अतिशय महत्त्व प्राप्त झाले. ऊन, वारा, पाऊस, अग्नी, सुर्य, चंद्र, तारे इत्यादी नैसर्गिक शक्तींना लोकांनी देवत्त्व बहाल केले व या नैसर्गिक शक्तींची आपल्यावर कृपा व्हावी यासाठी त्यांची पुजाआर्चा केली जावू लागली. त्याचबरोबर त्यांचा आपल्याला आर्शिर्वाद मिळावा या भावनेपोटी मोठ-मोठे यज्ञ करण्यास सुरूवात झाली. या यज्ञामध्ये बळी देण्याची प्रथा सुरू झाली. त्यास 'हवि'[१] असे ही म्हणतात. परंतु; त्याकाळात अशा या यज्ञाचे स्वरूप हे पूर्णपणे

ऐच्छिक होते. व्यक्ती आपल्या सामर्थ्यानुसार यज्ञ करीत असे. यज्ञ म्हणजे परमेश्वराची कृपा मिळविण्याचे एक साधन मानले जात होते.

परंतु; उत्तर ऋग्वेद काळात म्हणजेच गौतम बुद्धांच्या काळामध्ये यज्ञाचे स्वरूप बदलले. यज्ञसंस्थेचे समाजावर पूर्णत: वर्चस्व निर्माण झाले. यज्ञाच्या नावाखाली अनेक प्रकारची अनिष्ट कर्मकांडे सुरू झाली. यज्ञाचे स्वरूप तांत्रिकदृष्ट्या अत्यंत गुंतागुंतीचे बनले. यज्ञाचे वेगवेगळे प्रकारही निर्माण झाले. यज्ञ हे एक राज्य व धन प्राप्तीचे साधन मानले जावू लागले. व त्यामुळे यज्ञामध्ये मंत्रापेक्षा तंत्र व कर्मकांडाना महत्त्व प्राप्त झाले. यज्ञामध्ये मोठ्या प्रमाणात हिंसेला सुरूवात झाली. यज्ञामध्ये हविच्या नांवाखाली पशु-पक्ष्यांची हजारोच्या संख्येने बळी देण्यास सुरूवात झाली. दीघनिकायातील कूटदंत[२] या ब्राह्मणांने महायज्ञ करण्यासाठी व त्यामध्ये बळी देण्यासाठी सातशे बैल, सातशे खोंड, सातशे कालवडी, सातशे बकरे, सातशे मेंढे आणले होते. यावरून आपणास यज्ञातील हिंसेची दाहकता दिसून येते. त्याचबरोबर यज्ञाच्या वेळी लोकांमध्ये परस्पर वादही घडून येत असत. यामुळेही मोठी हिंसा घडून येत असे. यज्ञसंस्थेत पुरोहितांनाही अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले. त्यांनी स्वार्थी भूमिकेतून यज्ञामध्ये अत्यंत गुंतागुंत निर्माण करण्यास सुरूवात केली. पुरोहितांना पृथ्वीवरचे देवच म्हणून ओळखले जावू लागले.

"द्वया वै देवा: अ, ह वै दैवा:। अथ ये ब्राह्मणा:
शुश्रुवांस अनुचाना: ते मनुष्यदेवा:।।"[३]

याचा अर्थ असा की, "अहो देव दोन प्रकारचे आहेत. देव हे देव; आणि जे अध्ययनशील आहेत आणि परंपरेवर विश्वास ठेवणारे आहेत, ते मनुष्यदेव होत." अशा प्रकारचे विवेचन वैदिक साहित्यात येवू लागले व समाजाचा त्याप्रकारे जाणीवपूर्वक समज निर्माण केला जावू लागला, त्यामुळे ब्राह्मणांना समाजात आदराचे व श्रेष्ठ स्थान मिळाले. यज्ञाच्या माध्यमातून ब्राह्मणांनी सर्वसामान्य जनतेची लूट करण्यास सुरूवात केली. यज्ञाचे स्वरूप आर्थिकदृष्ट्या खर्चिक बनले, त्यामुळे सर्वसामान्य मनुष्याला असे हे खर्चिक व दीर्घकाळ चालणारे यज्ञ करणे अशक्य बनले.

गौतम बुध्द वेदांचा फोलपणा दार्खविताना तेविज्ज सुत्तामध्ये म्हणतात की, वेदाच्या केवळ ज्ञानाने ब्राह्मण मोहमुक्त, पाच बंधनातून मुक्त होऊ शकत नाहीतच, परंतु त्याने मुक्ती मिळेल या खोट्या आशेवर ते विसंबून असल्यामुळे बिनपाण्याच्या कोरड्याच नदीमध्ये पोहण्याचा प्रयत्न करून स्वत:च विषाद पावत आहेत. म्हणून ते तिन्ही वेदांतील ज्ञानास पाणी नसलेले शुष्क वाळवंट आणि वाट नसलेले निबिड अरण्य म्हणतात.[४] त्यांच्या मते, वेदच काय कोणतेही वाङ्:मय प्रमाण नसते, त्यामुळे प्रत्येक गोष्टीची पुन्हा-पुन्हा परीक्षा झाली पाहीजे.[५] व परिक्षेअंती आपल्या बुद्धीला जे योग्य वाटते त्यावरच आपणच विश्वास ठेवला पाहिजे.

गौतम बुध्दांनी वैदिक धर्मावर आधारित यज्ञयागास विरोध केलाच शिवाय त्यांनी वेदाचे प्रामाण्यही नाकारले. गौतम बुद्धांनी वेदांचे प्रामाण्य नाकारून एके दिवशी गौतम बुद्ध धर्मप्रसारासाठी फिरत असताना कालाम[६] नावाच्या क्षत्रियांच्या गावी गेले. तेथे कालामवासियांच्या मोठ्या जनसमुदायाला उपेदश करतांना त्यांनी सांगितले की, "एखादी गोष्ट पूर्वपरंपरेने चालत आली आहे, आपल्या पवित्र ग्रंथामुध्ये आहे किंवा ती अनुमानाने सिद्ध करता येते म्हणून खरे मानू नका किंवा तो एक लौकिक न्याय आहे, ती सुंदर दिसते अथवा आपल्या श्रद्धेला जुळते म्हणूनही खरे मानू नका किंवा त्याच्यावर विश्वास ठेवू नका. तर तुमच्या बुद्धीला जे पटते, त्याचे ग्रहण करा. त्यावरच विश्वास ठेवा."[७] या ठिकाणी गौतम बुद्धांनी वेदप्रमाण्य तर नाकारलेच त्याचबरोबर मानवी विवेक निष्ठेलाही महत्त्व दिले.

गौतम बुद्धांनी वैदिक धर्मावर आधारलेल्या या यज्ञसंस्थेस विरोध केला. त्यांनी यज्ञातील कर्मकांडे, हिंसा, अनिष्ठ रूढी-परंपरा यांना विरोध दर्शविला. यज्ञातील पशु-पक्षांच्या हत्येस विरोध केला. त्यांचा सर्वप्राणीमात्रांच्या समानतेवर विश्वास होता. सर्वांना जगण्याचा समान अधिकार आहे, असा विचार त्यांनी मांडला. यज्ञयागामुळे लाभ होतात हे त्यांना मान्य नव्हते. गौतम बुद्धांचे यज्ञासंबंधी विचार जाणून घेण्यासाठी दीघनिकायातील 'कूटदंतसूक्त'[८] महत्त्वाचे ठरते् कूटदंत सूक्तामध्ये गौतम बुद्धांनी खरा यज्ञ कसा असावा याबाबत मांडणी केली आहे.

एके दिवशी भगवान गौतम बुद्ध आपल्या भिक्खू महासंघासह मगध देशातील खाणमुक्त नावाच्या ब्राह्मण गावी आले. तेव्हा त्या गावचे निवासी व कूटदंत ब्राह्मण गौतम बुद्धांच्या दर्शनासाठी येतात. दरम्यानच्या काळातच कूटदंत ब्राह्मणाने एका महायज्ञाची योजना करून तयारी केलेली असते. त्यासाठी त्याने त्या यज्ञामध्ये बळी देण्यासाठी सातशे बैल, सातशे खोंड, सातशे कालवडी, सातशे बकरे, सातशे मेंढे याचा युप केलेल असतो. तेव्हा कूटदंत ब्राह्मण गौतम बुद्धांना म्हणतो की, "भौ गौतमा मी एक महायज्ञ करू इच्छित आहे तेव्हा मला सोळा परिष्कारंचा त्रिविध यज्ञविधी समजावून द्यावा."[१] तेव्हा कूटदंत ब्राह्मणाला उपदेश करताना गौतम बुद्ध म्हणतात. "एके दिवशी महाविजित राजाने चिरकाल सुखकारक व हितकारक होईल असा महायज्ञ करण्याचे मनामध्ये ठरविले येते. त्यानुसार त्याने आपल्या पुरोहिताजवळ आपला मनोदय व्यक्त केला. तेंव्हा त्याचा पुरोहित राजास म्हणाला की महाराज सध्या असा महायज्ञ करणे उचित होणार नाही. कारण सध्या आपल्या देशातील जनता ही संकटानी व पीडांनी ग्रासलेली आहे. राज्यात अशांतता आहे. गावे दरोडेखोरांकडून लुटली जात आहेत. तेव्हा अशा या संकटग्रस्त, पीडाग्रस्त व आपद्‌ग्रस्त प्रजेकडून यज्ञासाठी कर गोळा करणे योग्य होणार नाही. यावर उपाय म्हणून कदाचित तुम्हास असे वाटेल की, चोर-डाकूंना पकडून बंदिस्त करून, त्यांचा वध करून किंवा त्यांना देशाबाहेर घालवून राज्यात शांतता व सुव्यवस्था निर्माण करता येईल; परंतु महाराज! यामुळे वरील समस्या पूर्णपणे सुटणार नाहीत. कारण यातून जे कोणी चोर-डाकू वाचतील, जगतील ते पुन्हा प्रजेचा छळ करतील. तेव्हा राजाने यावर उपाय म्हणून पुढील गोष्टी कराव्यात.

राजाने आपल्या राज्यात जे शेती करू इच्छितात, त्यांना लागवडीसाठी जमिनी, बी-बियाणे, मशागतीसाठी लागणारी अवजारे व जगण्यासाठी अन्न द्यावे, जे व्यापार, धंदा करू इच्छितात त्यांना भांडवल द्यावे, नोकरी करू इच्छिणाऱ्यांना सरकारी नोकरी द्यावी. त्यामुळे सर्व माणसे आपापल्या कामात गुंतून राहतील व अर्थातच त्यामुळे राज्यात बंडाळी माजण्याचा संभव राहणार नाही. महाविजित राजाने त्यानुसार राज्यात

ताबडतोब उपाययोजना केली व त्याचा चांगला परिणामही घडून आला. प्रजा सुखी व समाधानी झाली. राज्याच्या खजिन्यामध्येही कराच्या स्वरूपाने प्रचंड संपत्ती जमा झाली. महाविजित राजाने आपल्या राज्याची परीस्थिती सुधारल्याचे पाहून पुन्हा चिरकाल सुखासाठी व हितासाठी यज्ञ करण्याचे ठरविले व आपल्या पुरोहितास कळविले. पुरोहिताने आपला हा विचार राजाने सर्व ग्रामीण व नागर क्षत्रिय यांना जाहिरनाम्याद्वारे कळवून त्यास त्यांची संमती मिळवावी व त्यांना त्यासाठी आमंत्रित करावे असे, महाविजित राजास सांगितले. त्यानुसार महाविजित राजाने जाहिरनामा काढला व प्रजेची संमती मिळविली.

प्रजेची संमती मिळाल्यानंतर पुरोहिताने यज्ञाची तयारी केली व त्यास प्रारंभ केला. या यज्ञामध्ये गाई, बकरे, मेंढे, डुकरे अथवा इतर कोणतेच प्राणी बळी देण्यात आले नाहीत. युपासाठी (वधाच्या अगोदर प्राण्यांना बांधण्यासाठी लागणारे खांब) झाडे तोडण्यात आली नाहीत. वेदीवर पसरण्यासाठी लागणारे दर्भ गवत तोडण्यात आले नाही; दास, नोकर, मजुर यांना जबरदस्तीने कामावर लावण्यात आले नाही. या यज्ञात फक्त तूप, तेल, लोणी, दही, मध आणि गूळ एवढेच पदार्थ वापरण्यात आले. यज्ञ चालू असताना ग्रामवासी, नागर क्षत्रिय, अमात्य, सभासद, जेष्ठ ब्राह्मण व धनवान गृहस्थ महाविजित राजास भेटण्यासाठी मोठमोठे नजराणे घेवून आले. राजाने त्यांचे नजराणे स्वीकारले नाहीत. तेव्हा उपरोक्त त्या सर्व देशवासियांनी त्या नजराण्यांचा खर्च करून राज्याच्या यज्ञशालेच्या चारी दिशांना धर्मशाळा बांधून अंध, अपंग, अनाथ, इत्यादी पीडीत लोकांना दानधर्म केला. अशा प्रकारचा यज्ञ सांगितल्यानंतर तो कूटदंत ब्राह्मण व त्याच्यासोबत आलेल्या सहकाऱ्यांना तो अतिशय आवडला. नंतर गौतम बुद्धांनी त्यांना आपल्या धर्माचा उपदेश सांगितला. तेव्हा कूटदंतावर याचा एवढा परिणाम झाला कि तो भगवान गौतम बुद्धांचा उपासक बनला. व त्याने यज्ञासाठी आणलेल्या सर्व प्राण्यांना सोडून दिले. अशा प्रकारे गौतम बुद्धांनी आपल्या उपदेशाद्वारे यज्ञातील हिंसा टाळली, त्याचबरोबर तत्कालिन समाजव्यवस्थे समोर आदर्श यज्ञाचे प्रारूप उभे केले.

गौतम बुद्धांनी या यज्ञाबरोबरच मनुष्य जातीला हितावह ठरतील असे यज्ञाचे विविध प्रकार सांगितले. त्या यज्ञामध्ये दानयज्ञ, विहारनिर्मितीयज्ञ, शिक्षापदयज्ञ, शीलयज्ञ यांचा समावेश होतो. व ते प्रकार दीघनिकायातील याच कूटदंतसुक्तात सांगितले आहेत.

**वैदिक ग्रंथातील वर्णव्यवस्था निर्मितीची संकल्पना :**

प्राचीन भारतामध्ये हिंदू धर्म साहित्य परंपरेच्या १) श्रुती व २) स्मृती अशा दोन परंपरा आढळून येतात. त्यापैकी श्रुती म्हणजे देव होय. वेद हे अपौरूय आहेत व त्यांची निर्मिती ईश्वराने केली आहे असा समज तत्कालिन लोकात रूढ होता. त्यामुळे लोक वेदाचे प्रामाण्य मानत असत. वैदिक ग्रंथामध्ये चार वेद, ब्राह्मणे, आरण्यके, उपनिषदे यांचा समावेश होतो. १) ऋग्वेद, २) सामवेद, ३) यजुर्वेद व ४) अथर्ववेद असे चार वेद आहेत.

ऋग्वेदाच्या प्रथम कालखंडामध्ये समाजरचना जातिभेदात्मक नव्हती. ब्रह्म, क्षत्र व विश्[१०] असे व्यवसायभेदाने निश्चिंत होणारे तीनच वर्ग अस्तित्वात होते. अजून शूद्र वर्ग निर्माण झाला नव्हता. मात्र ऋग्वेदाच्या अखेरच्या कालखंडामध्ये म्हणजे उत्तर ऋग्वेद कालखंडामध्ये पुरूषसूक्ताचा समावेश करण्यात आला. व या पुरूषसूक्ताच्या आधारे समाजामध्ये चार्तुर्वर्णव्यवस्था निर्माण झाली व तिला श्रेष्ठ-कनिष्ठत्वाची झालर मिळाली.

**ऋग्वेदातील पुरूषसूक्त -**

भारतीय समाजामध्ये चातुर्वर्ण्य व्यवस्था कशी निर्माण झाली हे जाणून घेताना ऋग्वेदाची माहीती मिळविणे अतिशय महत्त्वाचे आहे. ऋग्वेदातील दहाव्या मंडळातील नव्वदावी ऋचा ही 'पुरूषसूक्त'[११] म्हणून ओळखली जाते. पुरूषसूक्तानुसार विराजापासून पुरूष जन्मला, तेव्हा तो मागे व पुढे प्रस्तृत झाला. तेव्हा देवांनी या पुरूषाला यज्ञात बळी देण्याचे ठरविले व त्यानुसार यज्ञात बळी देत असताना, त्याच्या मुखातून ब्राह्मण जन्माला आले, त्याच्या बाहूतुन राजन्य म्हणजे क्षत्रिय जन्माला आले, मांड्यातून वैश्य जन्माला आले तर त्याच्या पायापासून शूद्र जन्माला आले. अशा प्रकारे समाजामध्ये चातुर्वर्ण्य व्यवस्था निर्माण झाली. असे वर्णन पुरूषसूक्तामध्ये आहे.

ऋग्वेदातील या पुरूषसूक्ताचा नंतरच्या सर्वच वैदिक साहित्यावर प्रभाव पडला. व वेगवेगळ्या वैदिक साहित्यामधून वर्णव्यवस्था व जातीव्यवस्थाविषयक नियम अधिकाधिक कडक बनत असताना याचा वापर केला जातो.

ऋग्वेदाबरोबरच यजुर्वेदामध्येही[१२] वर्णव्यवस्था निर्मितीविषयक विचार मांडण्यात आला आहे. यजुर्वेदाच्या वाजसनेयी संहितेमध्ये दोन भागात वर्णनिर्मितीविषयक सिद्धांत मांडण्यात आला आहे. पहिल्या भागामध्ये पुरूषसूक्तातील १६ श्लोकांचा जसेच्या-तसा उल्लेख केला आहे व त्याचबरोबर इतर ६ श्लोकांचीही भर टाकली आहे. तर दुसऱ्या भागातील सिद्धांतानुसार प्रथम देवांना प्रकाश देण्यासाठी, जो स्वत: प्रकाशमान आहे आणि देवांचा पुरोहित आहे अशा ब्रह्मदेवाची निर्मिती झाली. ब्रह्मदेवाला उत्पन्न केल्यानंतर देव म्हणालो, ''याचे ज्ञान ज्या ब्राह्मणाला झाले त्याच्या अधीन सर्व देव राहतील.'' अशा प्रकारे ब्राह्मण वर्गाची निर्मिती झाली. त्यानंतर देवांनी पंधरा जणांबरोबर स्तुती केली तेव्हा क्षत्रिय वर्ग निर्माण झाला. आणि एकोणीस जणांबरोबर स्तुती केली, तेव्हा शूद्र आणि वैश्य (आर्य) यांची निर्मिती झाली. कृष्ण यजुर्वेदातील तैतिरीय संहिता, तैतिरीय ब्राह्मण, यामध्येही चातुर्वर्ण्यनिर्मिती विषयक विचार आढळून येतात.

अर्थर्ववेदामध्ये[१३] ही चातुर्वर्ण्यनिर्मिती विषयक थोडक्यात विवेचन करण्यात आले आहे. याशिवाय पुराणे, ब्राह्मण आरण्यके, उपनिषदे या वैदिक साहित्यामध्येही वर्णव्यस्थाविषयक वर्णने आढळून येतात. याशिवाय नंतरच्या कालखंडामध्ये आलेल्या मनुस्मृती, याज्ञवल्क्यस्मृती, इत्यादी स्मृती ग्रंथामध्येही वर्णव्यवस्थेचे व जातिसंस्थेचे सांगोपांग सविस्तर विवरण आले आहे.

**गौतम बुद्धांचा क्षत्रिय मंडळाचा सिद्धांत :**

गौतम बुद्धांनी जन्माधिष्ठित वर्ण व जातीव्यवस्था नाकारली. त्याचबरोबर समाजावरील ब्राह्मण वर्गाचे अग्रहक्कही नाकारले. गौतम बुद्धांनी दिघनिकाय या ग्रंथामध्ये ब्राह्मण वर्गापेक्षा क्षत्रिय वर्गाची सत्ता किंवा अग्रहक्क कसे आहेत हे स्पष्ट करण्यासाठी जगदुत्पत्तीचा सिद्धांत सांगितला. त्यांच्या मतानुसार जगाची उत्पत्ती ही

एका विराट पुरूषाच्या शरीरापासून झाली नसून, ती एका इतिहासाच्या विकासक्रमाचा भाग आहे. सत्ययुगामध्ये माणसे सुखाने राहत होती. ती दुर्गुणविरहीत होती. परंतु प्रारंभीचे पावित्र्य घसरणीला लागले. अनिष्ठ कृत्ये घडू लागली. लैंगिक स्वैराचार निर्माण झाला. माणसा-माणसांत भेदाभेद केला जावू लागला. थोडक्यात पूर्वीच्या स्वर्गीय जीवनाची अधोगती भूजीवनात झाली. आता माणसाला जगण्यासाठी अन्न-पाण्याची गरज भासू लागली. व या गरजेपोटीच माणसे आपापसामध्ये करार करून राहू लागली. त्यातूनच कुटूंब व मालमत्ता या संस्थांची निर्मिती झाली.

कुटूंब व मालमत्ता या संस्थांची निर्मिती झाल्यानंतर त्यांच्या संरक्षणाचा प्रश्न निर्माण होवू लागला. चोऱ्यांचा उपद्रव व इतर असामाजिक तत्त्वांचा उदय झाला. तेव्हा लोकांनी एकत्र येवून सर्वसंमत्तीने एका आकर्षक व उत्तम प्रकृती असलेल्या कार्यक्षम व्यक्तीची नेता म्हणून निवड करून, त्याच्यावर संरक्षण करण्याची जबाबदारी सोपविण्याचे ठरविले. या नेत्यांने काही अटी घालून लोकांच्या या विनंतीस मान्यता दिली. या नेत्यासच १) महासम्मत २) खत्तिय आणि ३) राजा असे म्हणतात. यापैकी 'खत्तिय' या शब्दाचा अर्थ शेताचे संरक्षण करणारा असा होतो. पुढील काळात हा खत्तिय वर्गच 'क्षत्रिय'[१४] (संस्कृत) म्हणून ओळखला जावू लागला.

प्रारंभीच्या काळामध्ये एका बाजूस एकच 'क्षत्रिय' व दुसऱ्या बाजूस संपूर्ण जनता यांच्यामध्ये करार होत असे. परंतु पुढील काळात क्षत्रियांचा एक वर्गसमुहच निर्माण झाला. व क्षत्रियांचा वर्गसमुह आणि जनता यांच्यामध्ये करार होवू लागला. "अशा प्रकारे उमराव किंवा खत्तियमंडळ ह्या सामाजिक वर्तुळाचा जन्म झाला."[१५] यालाच "क्षत्रिय मंडळाचा सिद्धांत" असे म्हणतात.

या क्षत्रिय मंडळ सिद्धांताच्या माध्यामातून समाजव्यवस्थेवरील ब्राह्मण वर्गाचे अग्रहक्क फेटाळून लावले व क्षत्रिय वर्गास महत्त्वाचे मानले. त्याचबरोबर जगाची उत्पत्ती ही वैदिक साहित्यावर आधारीत पुरूष-सूक्तातील विराट पुरूषापासून झाली नसून, ती एक इतिहास विकासक्रमातील घटना आहे हे दाखवून दिले. व जगाच्या उत्पत्तीतील दैवी हस्तक्षेपाला छेद दिला.

**गौतम बुद्धांचा जन्मसिद्ध चातुर्वर्ण्याला विरोध :**

गौतम बुद्धांनी तत्कालिन वैदिक विचारांवर आधारलेल्या चातुर्वर्ण्यव्यवस्थेला विरोध केला. चातुर्वर्णीय व्यवस्था ही ईश्वर निर्मती नसून या वर्णव्यवस्थेच्या निर्मितीचा पाया वैदिक ग्रंथामध्ये मांडण्यात आलेल्या जगउत्पत्तीच्या व सामाजिक कराराच्या सिद्धांतामध्ये आहे, असे विचार मांडले. चार्तुर्वणव्यवस्था ही श्रमविभागणीची व्यवस्था आहे. मनुष्याचा वर्ण जन्मावरून ठरत नाही तर कर्मावून ठरतो हा महत्त्वाचा विचार गौतम बुद्धांनी प्रतिपादन केला. गौतम बुद्धांनी जन्मधिष्ठित वर्णव्यवस्थेला केलेला विरोध आपणास दिघनिकायातील अम्बट्ठसुक्त, एसुकारीसुक्त, मज्झिमनिकायातील ब्राह्मणवग्गातील अश्वलायनसूक्त इत्यादीमध्ये प्रतिबिंबित होताना दिसतात.

अम्बट्ठ सुक्ताच्या[१६] पहिल्या भागामध्ये वेद पुरस्कृत वर्णव्यवस्था व ब्राह्मणांनी स्वत:स बहाल केलेल्या श्रेष्ठत्वावर टीका करण्यात आली आहे. एके दिवशी वेदपठनामध्ये पारंगत असलेला अम्बट्ठ हा ब्राह्मण तरूण भगवान गौतम बुद्धांशी उर्मटपणे वागतो व त्यांच्यावर ''तुझ्यासारखे मुंडन केलेले मुंडक, श्रमण, हे नीच असतात.'' असा आरोप करतो. त्याचबरोबर शूद्र ब्रह्मदेवाच्या पायापासून उत्पन्न झालेले असतात. तसेच चार वर्णापैकी क्षत्रिय, वैश्य व शूद्र हे ब्राह्मणांचे सेवक आहेत व ब्राह्मण हा वर्ण सर्वात श्रेष्ठ आहे अशी बढाई मारतो. तेव्हा गौतम बुद्ध अम्बट्ठास हे पटवून देतात की, तो स्वत: ही एका शूद्र वंशात मोडणाराच आहे. कारण अम्बट्ठाचा मुळपुरूष जो कव्ह हेता, तो शाक्यांच्या दासीपासून झालेला होता. तो कण्ह पुढे मोठा विद्वान ऋषी झाला. त्याच्या विद्वत्तेमुळे ओक्काक राजा हतबल झाला व त्या ऋषीच्या मागणीप्रमाणे त्याने स्वत:ची कन्या कव्हास पत्नी म्हणून दिली. कव्हायन वंशाची सुरूवात या कण्हापासून झालेली आहे व अम्बट्ठ एक त्यातील वंश आहे. भगवान गौतम बुद्ध याठिकाणी जन्मावरून कोणासही श्रेष्ठ अथवा कनिष्ठ मानीत नाहीत. त्यांच्या मते, ''वर्णाची शुद्धता पाळणाऱ्यांमध्ये क्षत्रिय जरी श्रेष्ठ असले तरी कोणत्याही कुळात जन्मलेला विद्वान व चारित्र्यवान पुरूष हा सर्वच वर्णातील इतर पुरूषांपेक्षा श्रेष्ठ ठरतो.''[१४]

माज्झिमनिकायातील ब्राह्मणवग्गामध्ये जे अश्वलायनसूक्त[१७] आहे. त्यामध्येही गौतम बुद्धांच्या वर्णव्यवस्थेसंदर्भात विचार दिसून येतात. अश्वलायन सुक्ताचा मुख्य विषय हा चातुर्वर्ण्याचा सिद्धांत आणि त्याचा भाग असलेला ब्राह्मणांच्या श्रेष्ठत्वाचा सिद्धांत यांचे खंडन करणे हा आहे. एके दिवशी गौतम बुद्ध श्रावस्तीजवळील जेतवनात अनाथपिण्डिकाच्या उपवनात वेदात पारंगत असलेला अश्वलायन हा तरूण ब्राह्मण गौतम बुद्धाशी "चार वर्णांच्या शुद्धतेचे नियम कोणते?" संदर्भात युक्तिवाद करण्यास येतो. गौतम बुद्धास विचारतो कि, "हे गौतमा, ब्राह्मण असे मानतात ब्राह्मण हा श्रेष्ठ वर्ण आहे, तो शुक्ल आहे, ब्राह्मण वर्ण हाच शुद्ध आहे व ब्राह्मणांची निर्मिती ब्रह्मापासून झाली असून ते ब्रह्माचे औरस पुत्र आहेत व ते ब्रह्माचे दायाद (वंशज) आहेत. ह्याविषयी आपले काय मत आहे?"

यावर भगवान गौतम बुद्ध पहिल्यांदा अश्वलायनला विचारतात की, "पण अश्वलायना, ब्राह्मणाच्या पत्नी ऋतमती होतात, त्यांना गर्भधारणा होते, त्या अपत्यांना जन्म देतात आणि पाजतात. तर_मग अश्वलायन, मातेच्या उदरात जन्म घेवूनसुद्धा ब्राह्मण कशाच्या जोरावर सांगतात की ते ब्रह्मदेवाच्या मुखातून उत्पन्न झाले आहेत?"

तेव्हा अश्वलायन म्हणाला, "भो गौतम आपले म्हणणे काही असू द्या तरी पण आपण ब्रह्मदेवाचे दायाद आहोत यावर ब्राह्मणांचा पूर्ण विश्वास आहे."

दुसऱ्या वेळेस गौतम बुद्ध अश्वलायनला सीमेलगत असलेल्या योन आणि कम्बोज व इतर लगतच्या प्रदेशामध्ये फक्त १) आर्य आणि २) दास असे दोन वर्ण आहेत. व ज्याच्या-त्याच्या कर्मानुसार एखादा आर्य दास होवू शकतो व दासांचा आर्यही होवू शकतो असे सांगतात.

त्यानुसार अश्वलायन गौतमाचे वरील म्हणणे मान्य करतो.

तिसऱ्या वेळेस गौतम बुद्ध अश्वलायनास विचारतात की, अश्वलायना, जर एखादा क्षत्रिय प्राण्यांची हत्या करीत असेल, तो त्याच्या नाहीत अशा गोष्टी लुबाडत असेल, स्वच्छंदाने कामतृप्ती करीत असेल, खोटे बोलत असेल, निंदक असेल, लोकांशी कठोरपणे वागून टवाळक्या करीत असेल तो लोभी, दृष्ट प्रवृत्तीचा असेल तर

त्याचाच फक्त अध:पात होईल, तो दुर्गतीला जाईल पण अशाच वर्तनाचा ब्राह्मण, वैश्य शूद्र असेल तर ते दुर्गतीला जाणार नाहीत, त्यांचा अध:पात होणार नाही असे होईल काय?''

त्यावर अश्वलायन हे मान्य करतो. ज्याप्रमाणे क्षत्रियाच्या वरील कर्मामुळे जी स्थिती होईल तीच ब्राह्मण, वैश्य व शूद्राची पण होईल.

नंतर भगवान गौतम बुद्ध अश्वलायनास विचारतात की, ज्यामध्ये वैरत्वाची व दुष्टाव्याचा स्पर्श नाही अशी निखळ मैत्री फक्त ब्राह्मणच करू शकतो, ती क्षत्रिय, वैश्य, शूद्र करू शकत नाहीत काय?

त्यावर अश्वलायन म्हणतो की, ज्याप्रमाणे ब्राह्मण निखळ मैत्री करू शकतात, त्याचप्रमाणे क्षत्रिय, वैश्य व शूद्रही करू शकतात.

पुन्हा भगवान गौतम बुद्ध अश्वलायनासमोर असा प्रश्न उपस्थित करतात की, एखाद्या सार्वभौम राजाने चारी वर्णातील शंभर पुरूषांना गोळा करून त्यातील क्षत्रिय आणि ब्राह्मण कुळातील लोकांना चंदन आणि शालवृक्षाच्या लाकडापासून अथवा कमळाच्या वेलीच्या ढलप्या किंवा कांड्यापासून अग्नी निर्माण करण्यास सांगितले. त्याचप्रमाणे चांडाळ, निषाद, वेणु, रथकार, पुक्कुस कुळात जन्मलेल्या लोकांना कुत्र्यास अथवा डुकरास पाणी पाजण्याच्या लाकडी डोणीपासून अथवा रंगाऱ्याच्या दोणीतून आणलेल्या काटक्या किंवा एरंडाच्या वाळलेल्या काटक्यापासून अग्नी निर्माण करण्यास सांगितले. तेव्हा अश्वलायना उच्च-नीच मानलेल्या सर्व कुळातील पुरूषांनी उच्च प्रतीच्या व हलक्या प्रतीच्या वापरलेल्या लाकडापासून उत्पन्न होणारा अग्नी हा सारखाच असेल काय? त्यापासून निर्माण होणाऱ्या ज्वाळा, वर्ण, तेज सारखेच असेल काय? तो वेगवेगळ्या लाकडांपासून बनविलेला अग्नी, अग्नीची सर्व कार्ये पार पाडील की नाही?

त्यावर अश्वलायन वेगवेगळ्या प्रकारच्या लाकडापासून निर्माण होणाऱ्या अग्नीचे सारखेच गुणधर्म असतील हे मान्य करतो.

नंतर गौतम बुद्ध अश्वलायनास म्हणतात की, समज एखाद्या क्षत्रियकुमाराचा ब्राह्मणकन्येशी संबंध आला आणि त्यांना एक पुत्र झाला तर तो आपल्या पित्यासारखा आणि मातेसारखा असेल का? आणि आपण त्याला क्षत्रिय म्हणावे की ब्राह्मण? किंवा हीच परस्थिती ब्राह्मणकुमाराच्या आणि क्षत्रियकन्येच्या संदर्भात उद्‌भवली तर?

तेव्हा अश्वलायन असे उत्तर देतो की, क्षत्रियकुमार आणि ब्राह्मण कन्या किंवा ब्राह्मणकुमार आणि क्षत्रिय कन्या यांच्यापासून जन्मलेला पुत्र आपल्या पित्यासारखा व आईसारखाच असेल व त्याला आपण क्षत्रिय किंवा ब्राह्मण असेही म्हणू शकतो.

नंतर गौतम बुद्ध अश्वलायनास म्हणतात की, समज, एखादी घोडी आणि गाढव यांचा संग झाला आणि ह्या संगाचा परिणाम म्हणून एखादे पिल्लू जन्मास आले तर ते आपल्या आईसारखे असेल का बापासारखे? त्याला घोडा म्हणावे की गाढव?

यावर अश्वलायन म्हणतो की, घोडी व गाढव यांच्या संकरातून जन्म झाल्यामुळे त्यास आपण 'खेचर' असे म्हणतो. व या ठिकाणी मला भेद दिसून येतो, इतर दुसऱ्या उदाहरणांमदून मात्र मला कोणताच भेद दिसून येत नाही.

शेवटी भगवान गौतम बुद्ध अश्वलायनास दोन सहोदर ब्राह्मणकुमारांचे उदाहरण देतात व म्हणतात की, त्यातील एकाने वेदाध्ययन केले आहे व तो त्यात पारंगत आहे. तर दुसऱ्याने वेदाध्ययन केलेले नाही आणि तो त्यात अप्रगत आहे. तेव्हा एखाद्या श्राद्धामध्ये भोजनासाठी, थालिपाक अर्पण करण्यासाठी किंवा पाहुणे म्हणून भोजन देण्यासाठी ब्राह्मण प्रथम कोणास आमंत्रण देतील?

तेव्हा अश्वलायन म्हणतो की, जो वेदात पारंगत आहे, ज्याने वेदाध्ययन केले आहे, त्यासच पहिल्यांदा ब्राह्मण बोलावतील.

पुन्हा गौतम बुद्ध अश्वलायनास म्हणतात की समज, अश्वलायना, त्यातील त्या सहोदर ब्राह्मणकुमारात ज्याने वेदाचे अध्ययन केले आहे, तो वेदात पारंगत आहे. परंतु तो दु:शील, पापकर्मा असा आह. तर ज्याने वेदाचे अध्ययन केले नाही. त्यात तो अप्रगत आहे परंतु; तो शीलवान आणि पुण्यकर्मा आहे, तेव्हा या दोहोंतील कोणाला श्राद्धामध्ये भोजनासाठी पाहुणे म्हणून प्रथम बोलावतील?

तेव्हा अश्वलायन उत्तरतो की, जो ब्राह्मणकुमार अध्ययनशील नाही, वेदांत प्रवीण नाही पण; जो शीलवान आणि पुण्यकर्मा आहे त्यालाच ब्राह्मण प्रथम बोलावतील कारण, दु:शील, पापकर्मा आहे त्याला दान केल्यामुळे कोणतेच मोठे फल साध्य होणार नाही.

अगदी शेवटी गौतम बुद्ध अश्वलायनास म्हणतात; अश्वलायना, प्रथम तू जन्मसिद्ध वर्णाविषयी बोलत होतास, नंतर तू वर्ण सोडून दिलास व मंत्राविषयी (वेदपठणाविषयी) बोलत होतास व ते महत्त्वाचे मानत होतास आणि आता तू चार वर्णाच्या नैतिक शुद्धतेवर येवून ठेपलास व शीलाला महत्त्व दिलेस. व चातुर्वर्ण्याच्या शुद्धतेचा हाच निमय मी घालून देतो. तेव्हा अश्वलायन स्तब्धपणे काही न बोलता गप्प बसला.[१८]

अश्वलायन सूक्ताच्या माध्यामातून गौतम बुद्धांनी ऋग्वेदातील चार्तुवर्णव्यवस्था नाकारली त्याचबरोबर कोणताही वर्ण जन्मावरून श्रेष्ठ ठरत नाही तर तो मनुष्याच्या कर्मावरून श्रेष्ठ ठरतो हे दाखवून दिले. त्याचबरोबर नुसते कर्म उच्च किंवा श्रेष्ठ असून चालत नाही तर त्या कर्मास उत्तम शील व चारित्र्याची जोड असावी लागते असे सांगितले. उत्तम शील व चारित्र्य असलेला मनुष्यच आपल्या चांगल्या कर्मामुळे श्रेष्ठ ठरतो, असा महत्त्वाचा सिद्धांत गौतम बुद्धांनी मांडला.

**गौतम बुद्धांचा जन्मसिद्ध जातीव्यवस्थेला विरोध :**

गौतम बुद्धांनी जन्मसिद्ध वर्णव्यवस्थेबरोबरच जन्मसिद्ध जातीव्यवस्थेलाही विरोध केला. एके दिवशी गौतम बुद्ध इच्छानंगल[१९] नावाच्या गावाजवळील इच्चानंगल नावाच्या उपवनात राहत होते. तेव्हा वसिष्ठ आणि भारद्वाज या दोन तरूण ब्राह्मणांमध्ये "मनुष्य जन्माने श्रेष्ठ होतो की, कर्माने श्रेष्ठ होतो?" यावरून वाद निर्माण होतो. व तो परस्पर विरोधी वाद मिटविण्यासाठी ते गौतम बुद्धाकडे येतात व कोणाचे खरे व कोणाचे खोटे हे समजून देण्याची विनंती करतात.

तेव्हा भारद्वारज आपली बाजू मांडताना म्हणतो की, ''ज्याच्या आईच्या बाजूला आणि बापाच्या बाजूला सात पिढ्या शुद्ध असतील, ज्याच्या कुळात सात पिढ्यांपर्यंत वर्णसंकर झाला नसेल, तोच ब्राह्मण श्रेष्ठ होय.''

तर वसिष्ठाच्या मते, ''जो मनुष्य शीलसंपन्न आणि कर्तव्यदक्ष असेल, तोच ब्राह्मण होय.'' तेव्हा या दोघांच्या परस्पर वादावर तोडगा काढताना गौतम बुद्ध म्हणतात, निसर्गामध्ये गवताच्या, वृक्षांच्या, वनस्पतींच्या निरनिराळ्या जाती आढळतात. त्याचप्रमाणे किडे, मुंग्या इत्यादी बारीकसारीक प्राण्यांमध्येही वेगवेगळ्या जाती आढळून येतात. सर्पाच्या, श्वापदांच्याही अनेक जाती आहेत, पाण्यात राहणाऱ्या माशामध्येही व आकाशात उडणाऱ्या पक्ष्यांमध्येही अनेक जाती आहेत व त्यांचे वेगवेगळे प्रकार दिसून येतात. व या सर्वच प्राण्यांच्या, पशु-पक्ष्यांच्या निरनिराळ्या जातींची चिन्हे स्पष्टपणे दिसून येतात. पण मनुष्य प्राण्यामध्ये अशी कोणतीच चिन्हे दिसून येत नाहीत. सर्व मनुष्य प्राण्यांचे केस, कान, नाक, डोळे, ओठ, भुवया, मान, पोट, पाठ, हात, पाय इत्यादी अवयवांमध्ये समानत्त्व आढळून येते. त्यांच्यामध्ये किंचितसा फरक जाणवतो परंतु अगदीच भिन्नत्त्व होवू शकत नाही. म्हणजेच पशुपक्ष्यादिकांमध्ये जशा निरनिराळ्या जाती आढळून येतात, तशा मनुष्य प्राग्यामध्ये आढळून येत नाहीत. मनुष्य प्राण्याचे सर्व अवयव व गुणधर्म सारखे असल्यामुळे जातीभेद ठरविणे अशक्य आहे. परंतु मनुष्याच्या कर्मावरून जातीभेद ठरविणे शक्य आहे.[२०] असे गौतम बुद्ध दाखवून देतात.

एखादा ब्राह्मण गाईंचे पालन करून निर्वाह करीत असेल तर त्याला ब्राह्मण न म्हणता गवळीच म्हटले पाहिजे असे गौतम बुद्ध म्हणतात. त्याचबरोबर जो शिल्पकलेवर उपजीविका करतो त्यास कारागीर, जो व्यापार करतो त्यास वाणी, दुताचे काम करतो त्याच दूतच म्हटले पाहिजे. जो चोरी करतो त्यास चोर, युद्धात सहभागी होतो त्यास योद्धा, यज्ञयाग करून उपजीविका करतो तो याजक होय. जो राष्ट्रावर स्वामित्व चालवितो तो राजा होय. तेव्हा कोणीही मनुष्य जन्मावरून ब्राह्मण ठरत नाही किंवा अब्राह्मण ठरत नाही.

दुसरे एका ठिकाणी अग्नीहोत्री भारद्वार जेव्हा गौतम बुद्धांची "श्रमणा! मुंडका! चांडाळ!" अशी निर्भत्सना करतो, तेव्हा त्यास ते चांडाळ कसा होते आणि चांडाळाचा धर्म कोणता[२१] हेही समजावून सांगतात. गौतम बुद्धांच्या मते, सतत जो रागावतो, दुसऱ्यावर सूड उगवतो पाहतो, पापाने माखलेला आहे अशा नास्तिकदृष्टीच्या माणसास चांडाळ समजावे. जो मुक्या प्राण्यावर दया न करता, त्यांचा घात करतो, लूटालूट करतो, चोरी करतो, एखाद्याचे ऋण घेतले असता ते तो जेव्हा मागण्यास येतो तेव्हा मी देणेकरी लागतच नाही म्हणून ते बुडवितो किंवा स्वार्थाने, पैशासाठी खोटी साक्ष देतो त्यास चांडाळ समजावे. जो परदारागमन करतो, आपल्या वृद्ध आहे-वडीलांची सेवा न करता त्यांना किंवा आपल्या इतर आप्त लोकांना शिवीगाळी करतो, त्यांना मारतो त्यास चांडाळ समजावे.

गौतम बुद्ध या ठिकाणी चांडाळाचा अर्थ व धर्म तर सांगतातच शिवाय कोणताही मनुष्य जन्माने चांडाळ जातीचा ठरत नाही तर त्याच्या कर्माने तो चांडाळ ठरतो असेही सांगतात, कोणताही मनुष्य जन्माने चांडाळ किंवा ब्राह्मण ठरत नाही याचे हे पटवून देताना गौतम बुद्ध मातंग नावाच्या ऋषींचे उदाहरण देतात. मातंग नावाचे जे एक ऋषी होते ते पूर्वी श्वपाक (कुत्र्याचे मांस खाणारा) चांडाळपुत्र होते परंतु; पुढे त्यांची एवढी कीर्ती झाली की, मोठमोठे ब्राह्मण आणि क्षत्रियही त्यांची सेवा करू लागले. नंतर जेव्हा त्यांचा मृत्यू झाला, तेव्हा ते विमानात बसून ब्रह्मलोकी गेले. ब्रह्मलोकी जाण्यास त्यांना त्यांची जात आडवी आली नाही. जे चांगल्या कुळात जन्मलेले आहेत असे ब्राह्मणही जेव्हा वेगवेगळ्या प्रकारची पापे करतात तेव्हा त्यांची इहलोकामध्ये निंदा केलीच जाते परंतु; ते जेव्हा इहलोक सोडून परलोकामध्ये जातात, तेव्हासुद्धा ते दुर्गतीला जातात. त्यांची जात त्यांचे निंदेपासून किंवा दुर्गतीपासून त्यांचे संरक्षण करू शकत नाही. त्यामुळे गौतम बुद्ध म्हणतात की, कोणताही मनुष्य चांडाळ कुळात जन्मास आला म्हणून चांडाळ जातीचा होत नाही किंवा एखादा ब्राह्मण कुळात जन्मला म्हणून तो ब्राह्मण ठरत नाही. थर प्रत्येक मनुष्य आपल्या कर्मानुसार चांडाळाचा ब्राह्मण होवू शकतो किंवा ब्राह्मणाचा चांडाळही होवू शकतो.[२२]



15249

अशा प्रकारे गौतम बुद्धांनी वरील दोन प्रसंगातून मनुष्यातील जातीभेद हे नैसर्गिक नसून, त्यांना कोणताही नैसर्गिक आधार नाही व जन्मानुसार मनुष्याची एखादी जात ठरत नाही तर ती त्याच्या कर्मावरून ठरते असे दाखवून दिले. व वैदिक ग्रंथामधील जन्माधिष्ठित वर्ण व जातीव्यवस्था सिद्धांताला नकार दिला.

**''खरा ब्राह्मण कोणास म्हणावे?'' गौतम बुद्धांची भूमिका :**

भगवान गौतम बुद्धांनी जन्माधिष्ठित वर्ण व जातीव्यवस्थेला विरोध केला. त्यांच्या मते, कोणताही मनुष्य जन्मावर ब्राह्मण अथवा क्षत्रिय ठरत नाही किंवा वैश्य अथवा शूद्रही होत नाही, तर त्या मनुष्याच्या कर्माने तो श्रेष्ठ ठरतो. दिघनिकायातील 'कुटदंत' सूक्तामध्ये आणि 'सोणदण्ड'[२३] सूक्तामध्ये गौतम बुद्धांनी ब्राह्मण कोणास म्हणावे? किंवा त्यासाठी कोणत्या आवश्यक गोष्टी (पात्रता) लागतात याचे विवेचन केले आहे. ब्राह्मण कोणास म्हणावे? हे पाहत असताना आपण ही गोष्ट लक्षात ठेवली पाहीजे की, संपूर्ण बौद्ध वाड्:मयामध्ये 'ब्राह्मण' हा शब्द दोन अर्थानी वापरण्यात आला आहे. एक म्हणजे जो ब्राह्मण आई-वडीलांच्या पोटी जन्मास आला आहे तो व दोन म्हणजे 'ब्राह्मण' हा शब्द गौतम बुद्धांनी गुणदर्शक म्हणून वापरला आहे. म्हणजे जातीवाच आणि गुणवाचक असे दोन अर्थ बौद्ध वाड्:मयात 'ब्राह्मण' या संज्ञेसाठी वापरण्यात आले आहेत. धम्मपदामध्येही 'ब्राह्मण वग्गात' ब्राह्मणत्त्वाची गुणदर्शक व्याख्या करण्यात आली आहे.

दिघनिकायातील सोणदण्डसुत्तामध्ये भगवान गौतम बुद्धांनी सोणदण्ड नावाच्या विद्वान ब्राह्मणांकडून खऱ्या ब्राह्मणत्त्वाची पात्रता वदवून घेतली आहे. सोणदण्ड ब्राह्मण हा आपल्या मागच्या सात पिढ्यांपासून शुद्ध असतो. तो कुलवंत, सधन, त्याचबरोबर निघंटु, केटुभ आणि अक्षरप्रमेद यासह तीन्ही वेदांत पारंगत असतो. तो सुंदर देखणा आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वाचा असतो. असा हा सोणदण्ड ब्राह्मण व त्याचे सहकारी भगवान गौतम बुद्धांच्या दर्शनासाठी येतात. त्यावेळी भगवान गौतम बुद्ध आपल्या भिक्खूंच्या बरोबर अंगदेशातील चंपानगरी येथे विहार करीत होते. तेव्हा सोणदण्ड ब्राह्मण आणि त्याचे सहकारी गौतम बुद्धांस कुशलादि प्रश्न विचारून बाजूस बसतात.

भगवान गौतम बुद्ध सोणदण्ड ब्राह्मणास असा प्रश्न विचारता की, किती अंगानी (गुणांनी) युक्त असलेल्या ब्राह्मणास ब्राह्मण म्हणावे? व तो ब्राह्मण खोटे बोलत नाही किंवा खोटे बोलल्याचा त्याच्यावर आरोपही होत नाही.

भगवान गौतम बुद्धांच्या या प्रश्नाचे उत्तर देताना ब्राह्मण होण्यासाठी आवश्यक असणाऱ्या पुढील पाच अंगाचे प्रतिपादन करतो.

१) तो ब्राह्मण आपल्या माता व पित्यांच्याकडून मागच्या सात पिढ्यापासून शुद्ध असावा. त्याच्या कुलीनतेसंबंधी कोणताही आरोप केला गेला नसावा. किंवा त्यासंबंधाने त्याची निंदाही झालेली नसावी.

२) तो निघंटु[२४], केटुभ[२५] व अक्षरप्रभेद[२६] यासह तिन्ही वेद[२७] व पाचवा इतिहास याचे अध्ययन केलेला असावा. तो पदज्ञ, व्याकरण जाणणारा आणि महापुरूष लक्षणानीयुक्त असावा.

३) तो सुंदर देखणा व प्रेरणादायी असावा, त्याची कांती सतेच, सुंदर व गोऱ्या रंगाची असावी.

४) तो उच्च दर्जाने शीलवान असावा.

५) तो विद्वान, पंडित, मेधावी आणि यज्ञ-दक्षिणा घेण्यात पहिला किंवा दुसरा असावा.

वरील पाच अंगाचे प्रतिपादन केल्यानंतर, भगवान गौतम बुद्ध सोणदण्डास विचारतात की, या पाच अंगापैकी एखादे अंग वगळले तर त्यास ब्राह्मण म्हणता येईल काय?

त्यावर सोणदण्ड म्हणतो की, काही हरकत नाही, या पाच अंगापैकी आपण वर्णास (रंग) वगळले तर चालेल कारण तो ब्राह्मण जर इतर तीन अंगानीयुक्त असेल. म्हणजे तो माता-पित्याकडून शुद्ध असेल, अध्ययन करणारा, शीलवान आणि विद्वान असेल तर त्यास आपण ब्राह्मण म्हणू शकतो.

नंतर भगवान गौतम बुद्ध त्यास आणखी एक अंग वगळण्यास सांगतात व त्यास ब्राह्मण म्हणता येईल काय असे विचारतात?

त्यावर सोणदण्ड म्हणतो की, काही हरकत नाही या चार अंगापैकी तो मंत्रात (वेदात) अध्ययनशील असावाच असे नाही, कारण तो ब्राह्मण जर आपल्या मातापित्याकडून शुद्ध असेल, शीलवान असेल, मोठा विद्वान-पंडित असेल तरीही आपण त्यास ब्राह्मण म्हणू शकतो.

पुन्हा गौतम बुद्ध सोणदण्डास आणखी एक अंग वगळण्यास सांगतात व बाकीच्या दोन अंगानीयुक्त असणाऱ्या ब्राह्मणास ब्राह्मण म्हणता येईल काय? असा प्रश्न विचारतात.

पुन्हा सोणदण्ड म्हणतो, ठीक आहे, आपण या तीन अंगापैकी जातीस वगळू तो ज्यांच्या मागच्या सात पिढ्या शुद्ध आहेत अशा ब्राह्मण माता-पित्यांच्या पोटीच जन्मला पाहिजे असे काही नाही. पण तो शीलवान आणि विद्वान पंडित असावा लागले.

सोणदण्ड ब्राह्मणांने अनुक्रमे वर्ण (रंग), वेद अध्ययन-शीलता, जन्माधिष्ठित जात वगळून बाह्मणत्त्वाचे नियम सांगितल्यावर मात्र त्याचे त्याचे इतर सहकारी म्हणतात की, तुम्ही वर्ण, वेद आणि जातीस वगळून त्यांचा अपमान तर करीत आहातच पण त्याचबरोबर श्रमण गौतमाच्याच मताचा स्वीकार करीत आहात. यावर सोणदण्ड आपल्या सहकाऱ्यांना समजविताना सांगतो की, तुमच्यामध्ये जो अंगक नावाचा तरूण बसला आहे, तो माझा भाचा असून तो सर्व पाच अंगानीयुक्त असा आहे. परंतु जर का तो चोरी करी, परदारगमन करेल, खोटे बोलेल किंवा मद्यपान करील तर त्याठिकाणी वर्ण, मंत्र, जात काही उपयोगाची नाही. परंतु जर तो वर्ण, मंत्र, जात या ऐवजी शीलवान असेल, विद्वान पंडीत, सुज्ञ असेल तरच मी त्याला ब्राह्मण म्हणेन. सोणदण्डाच्या या युक्तीवादावर त्याचे सर्व सहकारी शांत बसतात.

तेव्हा पुन्हा गौतम बुद्ध सोणदण्डास विचारतात की, या दोन अंगापैकी आणखी एक अंग वगळले तर त्यास ब्राह्मण म्हणता येईल का?[२८]

त्यावर सोणदण्ड म्हणतो, नाही या दोन्ही अंगापैकी जर एक अंग वगळले तर त्यास ब्राह्मण म्हणता येणार नाही. कारण शीलाशिवाय प्रज्ञा शुद्ध होत नाही. आणि

प्रज्ञेशिवाय शील शुद्ध होत नाही. जो शीलवान असतो, त्यासच प्रज्ञा प्राप्त होते आणि प्रज्ञावानासच उत्तम शीलत्व प्राप्त होते. म्हणून या जगात प्रज्ञा व शील श्रेष्ठ आहेत. ते परस्परांवर अवलंबून आहे. आणि ज्या ब्राह्मणाच्या अंगी शील व प्रज्ञा यांचा सहवास आहे, त्यासच मी खरा ब्राह्मण म्हणतो.

याठिकाणी गौतम बुद्धांनी अशा प्रकारे सोणदण्ड ब्राह्मणाच्या तोंडून खऱ्या ब्राह्मणत्त्वासाठी आवश्यक असणाऱ्या गुणांचे महत्त्व वदवून घेतले. आणखी एके ठिकाणी "जो मनुष्य शीलसंपन्न आणि कर्तव्यदक्ष आहे तोच ब्राह्मण होय." ब्राह्मणत्त्व हे जन्मावर अवलंबून नसते तर ते सत्यनिष्ठेवर आधारीत असते असे गौतम बुद्ध सांगतात. गौतम बुद्धांचे खऱ्या ब्राह्मणत्त्वाच्या अंगाने आणखी महत्त्वाचे विचार 'धम्मपद'[२९] या ग्रंथामध्येही प्रतिबिंबित झाले आहे.

"साधुकारी साधु भवति, पापकारी पापोभवति ।[३०]
पुण्य पुण्येन कर्मणा भवति पाप: पावेन भवति ।।"

जो लोभी नसतो, ज्याने सर्व बंधने तोडली आहेत. जो अक्रोधी, संयमी, शीलवान, बहुश्रुत, चारित्र्यवान आहे, ज्याने याच जन्मात दु:खाचा नाश पाहीला आहे. ज्याने मृत्यूचा फेरा टाळला आहे, सत्य जाणले आहे तोच खरा ब्राह्मण होय.

जो सर्व प्राणीमात्रावर दया करतो, आपल्या आई-वडिलांची, आप्तजणांनी सेवा करतो, विरोधकांच्या मेळाव्यात विरोधरहित असतो, हत्याऱ्यांमध्ये बिनहत्यारी असतो, संग्रह करणाऱ्यामध्ये संग्रहरहित असतो, ज्याने द्वेष, अभिमान, मोह फेकून दिला आहे. तोच खर ब्राह्मण असे ब्राह्मणत्त्वासंबंधीचे विचार धम्मपदामध्ये प्रतिबिंबित झाले आहे. थोडक्यात.

"तपेन ब्रह्मचरियेन संयमेन दमेन च ।
एतेन ब्राह्मणो होति एतं ब्राह्मणमुत्तम ।।"

(सुत्तनिपात ३.९.६२)

(ब्राह्मण होण्यासाठी तप, ब्रह्मचर्य, संयम आणि दम हे गुण आवश्यक आहेत.)

अशाप्रकारे गौतम बुद्धांनी आपले वर्ण व जातीव्यवस्थाविषयक विचार विविध सूक्तांच्या माध्यमातून मांडले. धम्मपद या पुस्तकाच्या माध्यामातून गौतम बुद्धांचे ब्राह्मण गुणदर्शक विवेचन आढळून येते. गौतम बुद्धांचे हे विचार उत्तर ऋग्वेद काळामध्ये अस्तित्त्वात आलेल्या परिस्थितीच्या विरोधी होते किंवा त्या परिस्थतीचा परिपाक, परिणाम म्हणून अस्तित्त्वात आले. घौतम बुद्धांनी अशा प्रकारे जन्माधिष्ठित वर्ण व जातीव्यवस्थेचा विरोध केला. घौतम बुद्धांनी जन्माधिष्ठित वर्ण व जातीव्यवस्थेला विरोध तर केलाच शिवाय आपल्या 'धम्मसंघामध्ये' कोणत्याही प्रकारचा भेदाभेद न ठेवता सर्वांना समान स्थान व अधिकार दिले. घौतम बुद्धांच्या धम्मसंघामध्ये सर्व जातींचे, वर्णाचे लोक होते. त्यामध्ये उच्चवर्णीय जातीबरोबरच कनिष्ठ जातींनाही प्रवेश होता. गौतम बुद्धांच्या धम्मसंघामध्ये ब्राह्मण जातीबरोबरच शूद्र जातीलाही समान प्रवेश व स्थान होते. एके ठिकाणी पाली ग्रंथामध्ये आपल्या शिष्यांना उपदेश करताना गौतम बुद्ध म्हणतात, "शिष्य हो ! जशा मोठ्या नद्या, त्या कितीही असोत, गंगा, यमुना, अचिरवती, सरभू, मही जेव्हा विशाल समुद्राला मिळतात, तेव्हा त्यांचे जुने नाव आणि त्यांचे मुळस्थान नष्ट होते आणि त्यांना विशाल सागर हे एकच नाव प्राप्त होते; तद्वत क्षत्रिय, ब्राह्मण, वैश्य आणि शूद्र या चार जाती पूर्ण बुद्धांनी सांगितलेल्या धर्म आणि संघ यांच्या शिकवणीनुसार जेव्हा आपले घर सोडतात आणि परिव्राजक बनतात तेव्हा या जाती आपली जुनी नावे आणि जुनी कुलनावे यांचा त्याग करतात आणि त्यांना एकच नाव मिळते ते म्हणजे सक्यमुनीचे अनुयायी असलेले भिक्षू. यावरूनच बौद्धधर्मात व धम्मसंघात कोणताही जातीभेद नव्हता हे सिद्ध होते, गौतम बुद्धांनी आपल्या तत्त्वज्ञानामध्ये व्यक्तीच्या वर्ण, जाती, कुळापेक्षा तिच्या शीलाला, प्रज्ञेला अधिक महत्त्व दिले. व उच्च शील आणि प्रज्ञा हाच त्यांच्या बौद्ध तत्त्वज्ञाचा मुलभूत पाया होता.

# संदर्भ ग्रंथ सुची


१) प्रा. भिडे गजानन व इतर – 'प्राचीन भारतीय राजकीय व धार्मिक संस्था', फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९८९, पान नं. ७८

२) कोसंबी धर्मानंद – 'बुद्धलीला' म. व. शा. आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००७, पान नं. २४२

३) सौ. डांगे सिन्धू – "बौद्ध धर्म आणि तत्त्वज्ञान" कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे-३०, १९८०, पान नं. ७

४) धावरे वसंत – 'दिघनिकाय-१', सुगावा प्रकाशन, पुणे, १९८८, पान नं. १७४

५) कित्ता वरील प्रमाणे – पान नं. ३४

६) कित्ता २ प्रमाणे – पान नं. २२४

७) कित्ता वरील प्रमाणे – पान नं. २२५

८) कित्ता २ प्रमाणे –

९) प्रा. चिं. वै. राजवाडे, 'दीघनिकाय-१', इंटरनॅशनल सेंटर फॉर बुद्धिस्ट स्टडीज, १९९०, पान नं. १४९

१०) जोशी लक्ष्मणशास्त्री (संपादक) - मराठी विश्वकोश क्रमांक-६, महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ, १९९९, पान नं. ९५८

११) डॉ. आंबेडकर भीमराव – "शूद्र पूर्वी कोण होते?" क्षितिज पब्लिकेशन, नागपूर – २००१, पान नं. २१

१२) कित्ता वरीलप्रमाणे – पान नं. ३९

१३) कित्ता वरीलप्रमाणे – पान नं. ४१

१४) Ghoshal U. N. – "A History of Indian Political Ideas" Oxford University Press, 1959, Page No. 63

१५) डॉ. शर्मा रामशरण – (अनु. डॉ. रानडे पंढरीनाथ) "प्राचीन भारतातील राजकीय विचार आणि संस्था", डायमंड पब्लिकेशन्स, पुणे-३०, २००६, पान नं. ६९

१६) कित्ता ४ प्रमाणे - पान नं. ५४

१७) रेगे मे. पुं. – "अश्वलायन सूत्र" नवभारत (मासिक), अंक जानेवारी, २०००, पान नं. ३०

१८) कित्ता वरील प्रमाणे – पान नं. ३४

१९) कित्ता २ प्रमाणे – पान नं. २३३

२०) कित्ता वरीलप्रमाणे – पान नं. २३५

२१) कित्ता वरीलप्रमाणे – पान नं. २३६

२२) कित्ता वरीलप्रमाणे – पान नं. २३७

२३) कित्ता ४ प्रमाणे – पान नं. ९२

२४) निघंटू – वेदातील शब्दांचा अर्थ जाणणारा (पर्यायी शब्दातून योग्य अर्थ लावण्याचे शास्त्र)

२५) केटुभ – कल्प (=कर्माचे प्रयोगविधी)

२६) अक्षरप्रमेद – शिक्षा व निरूक्त (शिक्षा=उच्चार नियम, निरूक्त=अर्थज्ञान)

२७) तिन्ही वेद – जुन्या पालि बौद्ध वाङ्:मयात जेथे जेथे वेदांचा उल्लेख आला आहे, तेथे तेथे तो तीन वेद असाच आहे. मात्र मिलिंद पन्हो या बौद्ध ग्रंथात प्रथमच चार वेद असा उल्लेख येतो. त्यावरून अथर्व वेद हा चौथा वेद अशोकाच्या नंतर व मिनांडरच्या स्वारीअगोदर केव्हातरी सर्वमान्यता पावला असावा.

२८) कित्ता ४ प्रमाणे – पान नं. १००

२९) भावे विनोबा – (अनु.) 'धम्मपद' (नवसंहिता), परंधाम प्रकाशन, पवनार, १९९९

३०) कुलकर्णी अनंत – 'धर्मपद', प्रकाशक स्वतः, पान नं. ७